# 100 रुपये न दिल्याने तरुणाची निर्घुण हत्या

## नातेवाईकांसह नागरिकांचा कोतवाली ठाण्यासमोरच ठिय्या

### तिन्ही आरोपींना अटक





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 16 ) –** काही मित्रांनी दारु पिण्यासाठी एका तरुणाला 100 रुपये मागितले, परंतू त्याने केवळ 20 रुपये दिले. ही बाब अपमानस्पद वाटल्याने त्या तरुणाची धारदार शस्त्रांनी निर्घुण हत्या करण्यात आली. निशांत ऊर्फ गोलू सुनिल उसरडे (34, रा. झाडपी पुरा, तिसरा नागोबा, रतनगंज, मोहन साहु आखाड्याजवळ, नागपुरी गेट) असे मृताचे नाव आहे. ही धक्कादायक घटना चित्रा चौकाजवळील मॅक्स मॉल स्थित मोची गल्लीच्या कार्नरवर मंगळवारी रात्री 10.30 वाजताच्या सुमारास घडली. या घटनेनंतर मृताच्या नातेवाईकांसह परिसरातील नागरिकांचा रोष उफाळून आला होता. बुधवारी मृतांच्या नातेवाईकांसह परिसरातील नागरिकांनी शहर कोतवाली पोलिस ठाण्यासमोरच ठिय्या मांडून आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी केल्याने प्रचंड खळबळ उडाली होती. दरम्यान याप्रकरणात कोतवाली पोलिसांनी विक्की परशुराम गुप्ता (30, रा. रतनगंज), योगेश गजानन गरुड (32, रा. विलासनगर), कमल रमेश साहु (32, रा. रतनगंज) यांना अटक केली. त्यानंतर नागरिकांचा रोष शांत झाला.

16 ऑक्टोंबर रोजी रात्री कोतवाली हद्दीतील चित्रा चौक स्थित मोची गल्लीच्या कार्नरवर क्षुल्लक कारणावरुन गोलु सुनिल उसरटेची हत्या करण्यात आली. याप्रकरणात गोपाल अंकुश चव्हाण (41, रा. रतनगंज) यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपींविरुध्द खुनाचा गुन्हा नोंद केला. सदर गुन्ह्याच्या तपासात गुन्ह्यातील आरोपी हे घटनास्थळावरुन फरार झाले होते. दरम्यान सीपी स्कॉडने आरोपींचा शोध सुरु केला. त्यावेळी गोपनिय माहीतीवरून या गुन्ह्यातील मुख्य आरोपी योगेश उर्फ गोलु गजानन गरुड (30, रा. विलास नगर) याला अकोला येथून ताब्यात घेतले. तो अहमदाबाद येथे जाण्याच्या तयारीत होता. दरम्यानच त्याला शस्त्रानिशी अकोला रेल्वे स्टेशन येथुन ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीस प्राथमीक रीत्या विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा प्रेम संबंधातुन केले असल्याचे सांगीतले आहे. सदरची कार्यवाही पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहा. पोलीस आयुक्त जयदत्त भवर, पोलिस निरीक्षक मनोहर कोटनाके यांच्या मार्गदर्शनात क्रिमीनल इंटेलीजन्स युनिटमधील प्रभारी एपीआय महेन्द्र इंगळे, एएसआय विनय मोहोड, पोलिस हवालदार सुनिल लासुरकर, जहीर शेख, अतुल संभे, राहुल ढेंगेकर यांनी केली आहे. तर अन्य आरोपींना कोतवाली पोलिसांनी अटक केली आहे.



आरोपी



आरोपी

### राजकीय नेते मंडळी पोहोचले कोतवाली ठाण्यात

निशांतच्या हत्या प्रकरणातील आरोपीला अटक करण्याची मागणी घेऊन त्याच्या नातेवाईकांसह नागरिकांनी पोलिस ठाण्यासमोरच ठिय्या दिला होता. यावेळी कॉंग्रेसचे डॉ. सुनिल देशमुख, बबलु शेखावत व विलास इंगोले यांनी प्रथम आंदोलनस्थळी बसलेल्या नागरिकांची व्यथा जाणून घेतली. त्यानंतर आमदार रवि राणा यांनीही पोलिस ठाणे गाठून ठाण्यासमोर बसलेल्या नागरिकांची भेट घेतली. शहरात सातत्यपूर्ण होत असलेल्या हत्येच्या घटना पाहता कायदा व सुव्यवस्था बिघडली आहे. गुन्हेगारीवर पोलिसांचा वचक राहिला नाही. त्यामुळे गुन्हेगारांना तत्काळ अटक करा, यासंबंधाने वरिष्ठ पोलिस अधिकारी यांच्यासह गृहमंत्री व मुख्यमंत्री यांच्याशी संवाद साधून पोलिस प्रशासनाला योग्य ते निर्देश द्यावे, असे सांगितले असल्याचे यावेळी आ. रवि राणा म्हणाले.

### पोलिस ठाण्यासमोरच ठिय्या

या घटनेनंतर जिल्हा सामान्य रुग्णालयात प्रचंड गर्दी झाली होती. यावेळी मृतकाचे नातेवाईक व त्याच्या मित्रमंडळीने संताप व्यक्त करून गोंधळ घातला. त्यामुळे तणावसदृश्य वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे पोलिसांनी चोख बंदोबस्त लावून तणावसदृश्य स्थिती हाताळली. बुधवारी सकाळी शवविच्छेदन गृहासमोरही मोठी गर्दी जमली होती. त्यानंतर मृताचे नातेवाईक व परिसरातील नागरिकांनी शहर कोतवाली पोलिस ठाणे गाठले आणि पोलिस ठाण्यासमोरील रस्त्यावरच ठिय्या दिला. या ठिकाणी प्रचंड नारेबाजी करून आरोपीला तत्काळ अटक करण्याची मागणी केली. तीन तास रस्त्यावर नागरिक बसले होते. त्यामुळे दोन्ही बाजुची वाहतुक पोलिसांनी बंद केली होती. दरम्यान आरोपींना अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर नातेवाईकांचा रोष शांत झाला. परंतू या ठिय्या आंदोलनामुळे प्रचंड खळबळ उडाली होती.

# कृ.उ.बा.समितीची शेतकरी विरोधी भूमिका?

## खरेदी-विक्री संघाकडून पत्रव्यवहाराला केराची टोपली

### हमीभाव खरेदीकरिता जागाच नाही

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,( दि.16 )–** शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने आधारभूत किंमत योजनेअंतर्गत नाफेड मार्फत हमीभावाने सोयाबीन खरेदी सुरु करण्याचे आदेश दिले आहे. असे असताना खरेदीच्या अगदी मुहुर्तावर चांदुर बाजार कृ.उ.बा समितीच्या आवारामध्ये जागा उपलब्ध नसल्याचे कारण समोर करून नाफेडच्या सोयाबीन खरेदीला अडथळा निर्माण करण्यात आला आहे. ज्यामूळे 15 ऑक्टोंबर पासून नाफेड मार्फत हमीभावाने सुरु होणारी खरेदी लांबणीवर पडली आहे. याबाबत खरेदी–विक्री संघाकडून करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराला कृउबा समितीने केराची टोपली दाखविली आहे, ज्यामूळे याप्रकाराविरोधात शेतकरांमध्ये रोष पहायला मिळत आहे.

बाजार समिती मधील लिलाव शेड, ओटे व अन्य सुविधा शासनाच्या अनुदानामधुनच शेतकऱ्यांच्या सुविधेकरिता निर्माण करण्यात आल्या आहे. असे असताना शासनाच्या खरेदीला बाजार समितीने जागा उपलब्ध नसल्याचे कारण समोर केले आहे. खरेदी विक्री संस्थेकडे सोयाबीन विक्रीच्या नोंदणी करीता तालुक्यातुन 200 शेतकऱ्यांचे आजपर्यंत अर्ज प्राप्त झाले आहे. त्यांची ऑनलाइन प्रक्रिया सुरु आहे.



### गोदामाचे केले पक्ष कार्यालय

खरेदी–विक्रीच्या आवारात संस्थेचे तीन गोदाम असून एक गोदाम कोणत्या तरी राजकीय व्यक्तीचे पक्ष कार्यालय आहे. तर इतर दोन ग्रिडमध्ये शहरातील कृषी केंद्र चालक यांचे रासायनिक खते ठेवण्यात आले आहे. त्याचे उत्पन्न कोठे आणि कसे घेतले जाते हा संशोधनाचा भाग आहे.

"नाफेडच्या सोयाबीन खरेदीसाठी जागा उपलब्ध करुन द्यावी. या संदर्भात चांदुर बाजार खरेदी विक्री संस्थेने कृ.उ.बा.बाजार समितीकडे 1 ऑक्टोबर ला पत्र व्यवहार केला, परंतु बाजार समितीने जागा उपलब्ध करुन देऊ शकत नाही. या संदर्भात खरेदी–विक्री संस्थेला पत्र दिले तेव्हा या पत्राची दखल घेउन आम्ही जिल्हा उपनिबंधक सह.संस्था अमरावती व विभागीय सहनिबंधक अमरावती यांच्या सह वरिष्ठ स्तरावर पत्र व्यवहार करुन बाजार समितीच्या भूमिकेचा निर्णय कळविला. तेंव्हा वरिष्ठ स्तरावरुन आदेश आल्या नंतर पुढील खरेदी करण्यात येइल.

**डॉ.प्रतापराव अ.किटुकले,**
**अध्यक्ष, चांदुर बाजार खरेदी विक्री संस्था, चांदुर बाजार.**

"बाजार समिती ही शेतकऱ्यांच्यासाठीच तयार झालेली असून शेतकऱ्याचे धान्य ठेवणे बाजार समिती नकार कशी देईल. मात्र जागा उपलब्ध नसेल तर शेतकऱ्यांचे धान्य बाजार समितीत कुठे ठेवायचे हा प्रश्न आहे. बाजार समितीमधील सर्व गोडाऊन मध्ये शेतकऱ्याचा धान्य असून व्यापाऱ्यांचा कुठेही धान्य नाही. व्यापाऱ्यांना सात दिवसाच्या ऐवजी तीन दिवसाची मुदत नंतर धान्य गोडाऊन मध्ये ठेवू देण्यात येत नाही. ताकाला जाऊन भांडे लपवण्याची भूमिका खरेदी विक्री करून घेतली जात आहे. सध्या बाजारात समिती मध्ये मोठ्या प्रमाणात सोयाबीन आवक आहे त्यामुळे जागा उपलब्ध असल्यास शेतकऱ्यांना शेड किंवा गोदाम देण्यास काहीच अडचण नाही.

**सतीश मोहोड,**
**संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, चांदूर बाजार.**

### लैंगिक अत्याचाराने अल्पवयीन गर्भवती

**मोर्शी –** लैंगिक अत्याचारपिडित अल्पवयीन मुलगी गर्भवती झाल्याची घटना मोर्शी पोलिस ठाण्याच्या हद्दीत 15 ऑक्टोंबर रोजी उघडकीस आली. पिडित मुलीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी अब्दुल रऊफ अब्दुल खलील (20) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पोलीस सूत्रानुसार तिवसा तालुक्यातील एका 18 वर्षीय मुलीला आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून तिला प्रेम जाळ्यात अडकविले. दरम्यान अब्दुल रऊफ अब्दुल खलीलने तिच्यावर बळजबरीने शारीरीक सबंध प्रस्थापीत केले. त्यामुळे ती 8 महिन्याची गर्भवती झाली. या घटनेची तक्रार पिडित मुलीने मोर्शी पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात संदीप वंजारी करीत आहे.

### 48 तास उलटून ती मृतक मुलगी अनोळखीच

#### बडनेरा पोलीसांकडून तपासाला गती

**अमरावती –** बडनेरा रेल्वे स्थानकाच्या पाण्याच्या टाकीजवळ मंगळवारी सकाळी एका मुलीचा विवस्त्र मृतदेह आढळून आला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. प्रकरणाच्या दुसऱ्या दिवशीही मुलीची ओळख पटू शकली नाही. बडनेरा पोलिस ठाण्यासह रेल्वे पोलिसांनी या तरुणीबाबत कोणाला काही माहिती असल्यास पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

मंगळवारी सकाळी बडनेरा रेल्वे स्थानकाजवळ एका अनोळखी महिलेचा मृतदेह दिसला. ही माहिती बडनेरा रेल्वे पोलीस व बडनेरा पोलिसांना देण्यात आली. मुलीच्या अंगावर जखमा आढळल्या असून शेजारी रक्ताचे डाग आढळून आले आहेत. त्यामुळे ही हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला जात होता. रेल्वे पोलीस आणि बडनेरा पोलीस या प्रकरणाचा तपास करण्यात व्यस्त आहेत. मात्र ही घटना उघडकीस येऊन 48 तासांहून अधिक काळ लोटला तरी अद्याप मुलीची ओळख पटलेली नाही.

### अतिरिक्त आयुक्तपदी शिल्पा नाईक रुजू

**अमरावती –** अमरावती महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्तपदी शिल्पा नाईक बुधवारी रुजू झाल्या आहेत. यावेळी आयुक्त सचिन कलंत्रे यांनी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शिल्पा नाईक ह्या धुळे येथील जिल्हा प्रशासन अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांची नुकतीच महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. त्यांनी यापूर्वी धुळे येथील जिल्हा प्रशासन अधिकारी म्हणून कामकाज केले. त्यांनी अमरावती महानगरपालिकेत बुधवारी अतिरिक्त आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारला.

# अचलपूरवासियांना खदखदून हसविणार 'महाराष्ट्राची हास्य जत्रा'

सिने अभिनेत्री सई ताम्हणकरसह अर्धा डझन कलाकारांची उपस्थिती

18 ऑक्टोबरला गांधीपूल येथे दिमाखदार आयोजनाची मेजवाणी

आ.बच्चू कडू यांची होणार ग्रँड मुलाखत





डॉ.निलेश साबळे




सई ताम्हणकर




भाऊ कदम



पृथ्वीक प्रताप



शिवाली परब



सुपर्णा शाम

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती,( दि.16 )– अवघ्या महाराष्ट्राला वेड लावणारी 'महाराष्ट्राची हास्य जत्रा' येत्या 18 ऑक्टोबर रोजी अचलपूर नगरीला खदखदून हसवायला येत आहे. सिने अभिनेत्री सई ताम्हणकर यांच्यासह हास्यजत्रेतील अर्धा डझन महारथी कलाकारांची या कार्यक्रमाला उपस्थिती असणार आहे. इतकेच नाही तर अचलपूरवासियांकरिता डबल मेजवाणी म्हणून आ. बच्चू कडू यांची ग्रँड मुलाखत सुध्दा या मंचावर घेण्यात येणार आहे. तसेच भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम देखील याठिकाणी पार पडणार आहेत. अचलपुर मधील गांधीपुलावर सायंकाळी 6 वाजता या दिमाखदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.*

महाराष्ट्राला खदखदून हसवणारे अभिनेते डॉ.निलेश साबळे, भाऊ कदम,पृथ्वीक प्रताप, शिवाली परब, सुपर्णा शाम आदी मराठमोळे कलाकार पहिल्यांदा अचलपूर मधील नागरिकांना लोटपोट करायला येत आहे. आ. बच्चू कडू यांच्या वतीने अचलपूर मतदार संघातील रसिक महिला, पुरुषांकरिता या हास्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील प्रेक्षकांना टीव्ही समोर खिळवून ठेवणाऱ्या महाराष्ट्राची हास्यजत्रेने आजवर मोठ्या शहरातच लाईव्ह कार्यक्रमांचे आयोजन केले. मात्र पहिल्यांदा अमरावती जिल्ह्यात आणि त्यातही अचलपूर सारख्या ठिकाणी या कार्यक्रमाचे खास आयोजन करण्यात आले आहे.

### डॉ.निलेश साबळे घेणार आ.बच्चू कडूंची मुलाखत

हस्यजत्रेच्या या मंचावर डॉ.निलेश साबळे हे आ.बच्चू कडू यांची मुलाखत घेणार असून ही मुलाखत अवघ्या महाराष्ट्रात भूकंप करणार असल्याचा अंदाज या निमित्ताने लावण्यात येत आहे. या कार्यक्रमांसोबत महिलांसाठी अगदी फेवरेट असलेल्या भावोजींचा 'होम मिनिस्टर' या कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले आहे. अचलपूर नगरीत पहिल्यांदा होत असलेल्या महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### शुद्धिपत्र

ही जाहिरात खावडा फेज IV-C पॉवर ट्रॉन्स्मिशन लि. यांनी 7 ऑक्टोबर 2024 रोजी वर्तमानपत्रांत प्रसिध्द केलेल्या जाहिर सूचना जाहिरातीच्या अनुषंगाने आहे.

या स्किम अंतर्गत समाविष्ट असणाऱ्या पारेषण वाहिन्या खालील गावे, कसबे व शहरे यांच्या आतून, वरुन, भोवतीच्या भागातून आणि मधून जातील.

**i) दक्षिण ओलपाड (जीआईएस)–बोईसर –II (जीआईएस) 765 केव्हि डी/सी वाहिनी**

| अनु. क्र | गावांची नावे | तहसील | जिल्हा | राज्य/संघ राज्य/राज्य क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| 1. | सोंसक, करंज, नेश, जिनोद, मिर्जापोर, मोर, भागवा, देलसा, कपासी, कुंडियाना, दांडी, लावछा, आडमोर, भांडूत, सेलूत, नरथान, पिंजरात, दिहेन, अरियाना, आंभेटा, कुंकणी, सिठना, सेग्वाछमा, बारबोधन, तेना, उमरा, गोठण, परिया, सयान, बालकस, बाल्कश, सेग्वास्यादला कंतारा, वास्वारी, नवापरा, काकड, सायला | ओलपाड | सूरत | गुजरात |
| 2. | बरोडिया | महुवा | सूरत | गुजरात |
| 3. | मुंजलाव | कामरेज | सूरत | गुजरात |

**ii) बोईसर –II (दोन्ही सर्किट) येथील नवसारी (न्यु)–पडघे (पीजी) 765 केव्हि डी/सी वाहिनीचा लिलो**

| अनु. क्र | गावांची नावे | तहसील | जिल्हा | राज्य/संघ राज्य/राज्य क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| 1. | लहांगेपाडा, भिलिया डोंगर, खाणेचापाडा, देहेरजा, झिरवपाडा | विक्रमगड | पालघर | महाराष्ट्र |

**iii) बोईसर –II (सेक्शन–II)–वेळगाव (एमएच) 400 केव्हि डी/सी (क्वॅड एसीएसआर/एएएसी/एएल 59 मूस इक्विव्हॅलन्ट) वाहिनी**

| अनु. क्र | गावांची नावे | तहसील | जिल्हा | राज्य/संघ राज्य/राज्य क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| 1. | फुटारकंडी, भिलिया डोंगर, कुंभस्तोपदा, हातने, देहेरजा, खाणेचापाडा, भोईरपाडा, झिरवपाडा, घोंडपाडा, झाडपोली, चंदनपाडा, गुणांगनपाडा, पंबाचापाडा, चिंचपाडा, वामनपाडा, राध्याचापाडा | विक्रमगड | पालघर | महाराष्ट्र |

**iv) (दोन्ही सर्किट्सवर) नाममात्र व्होल्टेजने प्रत्येक सर्किटला किमान 1700 एमव्हिए क्षमतेच्या ट्विन एचटीएलएस कंडक्टरचा वापर करुन बोईसर –II (सेक्शन–I) येथील बाभळेश्वर– पडघे (एम) 400 केव्ही डी/सी वाहिनीचा लिलो**

| अनु. क्र | गावांची नावे | तहसील | जिल्हा | राज्य/संघ राज्य/राज्य क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| 1. | सजन, झादापोली | विक्रमगड | पालघर | महाराष्ट्र |

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती


मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मोर्शी विधानसभा मतदार संघात उमेदवारीसाठी 'रस्सीखेच'

## मतदारांचा उत्साह शिगेला ■ निवडणूकीचा विषय चर्चेच्या केंद्रस्थानी

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.16 )** - विधानसभा निवडणुकीत वरुड-मोर्शी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळावी याकरिता इच्छुकांमध्ये चांगलीच रस्सीखेच सुरु आहे. इच्छुक उमेदवार आपली दावेदारी सांगत आपल्यालाच उमेदवारी मिळावी याकरिता वरिष्ठ नेत्यांकडे वशिलाही लावत आहेत. दूसरीकडे आचारसंहिता घोषीत होताच मतदारांमध्ये निवडणूकीला घेवून उत्साह दिसत आहे. चावडीवरच्या प्रत्येक गप्पांमध्ये निवडणूकीचाच विषय केंद्रस्थानी असल्याचे दिसत आहे.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीचे निकाल पाहता यावेळची विधानसभा निवडणूक भाजपला कठीण वाटत असली तरी, उमेदवारी मिळण्याकरिता इच्छुकांची गर्दीही कमी नाही. सन 2014 च्या निवडणूकीत मध्ये भाजपचे आमदार अनिल बोंडे यांना या मतदारसंघात मोठा लीड मिळाला होता. त्यांच्या कार्यकाळातील कामाचा लेखाजोखा पाहून 2019 मधील विधानसभा निवडणुकीत भाजपाने त्यांनाच उमेदवारी दिली. परंतु स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उमेदवार देवेंद्र भुयार यांनी अनिल बोंडे यांचा पराभव करून विजय मिळविला. आता मात्र ती परिस्थिती राहिली नाही. आता महाविकास आघाडी व महायुती मिळून सहा पक्ष ही निवडणूक लढत आहे. यामध्ये भाजपा, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार गट मिळून महायुती तयार झाली, तर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प. गट) व शिवसेना(उबाठा) मिळून महाविकास आघाडी तयार झाली आहे. महायुती मधून विद्यमान आमदार देवेंद्र भुयार यांची उमेदवारी निश्चित मानल्या जात आहे. मात्र त्यांना भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्याचा मोठ्या प्रमाणात विरोध होत असल्याने ऐन वेळेवर त्यांची उमेदवारी रद्द करून भाजपच्या कार्यकर्त्यांना उमेदवारी मिळू शकते अशी चर्चा आहे. मागील विधानसभा निवडणुकीत सलग दोनदा राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार हर्षवर्धन देशमुख यांना पराभव पत्करावा लागला होता. यावेळी मात्र परिस्थितीत बदल होण्याची शक्यता दिसून येत आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारीसाठी हर्षवर्धन देशमुख, काँग्रेसकडून गिरीश कराळे यांच्यात उमेदवारीसाठी चुरस दिसून येत आहे.



### आक्रोश जनशक्ती संघटना देखील मैदानात

मागील पाच वर्षा अगोदर वंचित बहुजन आघाडीमध्ये सक्रिय असलेले सुशील बेले यांना काही अपरिहार्य कारणास्तव पक्षाने बाहेरचा रस्ता दाखविला, परंतु सुशील बेले हे चळवळीचे कार्यकर्ते असून ते स्वस्थ न बसता त्यांनी स्वत: आक्रोश जनशक्ती संघटना काढून आपले समाजकार्य सुरु ठेवले, त्यामूळे त्यांनीही जनतेचा विश्वास कमावला आहे, या निवडणुकीत आक्रोश जनशक्ती संघटना म्हणून मैदानात उतरण्याची दाट शक्यता आहे.

### शिवसेना शिंदे गटाचा दावा

शिवसेनेचे दोन तुकडे पडल्यानंतर वरुड,मोर्शी विधानसभेमध्ये अमोल भुयारच्या माध्यमातून शिवसेना शिंदे गटाला उभारी मिळाली. पक्षाला वरुड-मोर्शी विधानसभा मतदारसंघात पकड मजबुत केली. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत अमोल भुयार महायुतीचा चेहरा असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### वंचित बहुजन आघाडीचाही खेळ

वंचित बहुजन आघाडी विधानसभा निवडणूकीत काय खेळ करणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. सध्या वंचित मतदारसंघातील सुत्र डोंगरे यांच्याजवळ जरी असले, तरी माजी आमदार पुरुषोत्तम मानकर यांचे पुतणे म्हणून सौरभ मानकर हे सुद्धा दावेदारी करू शकतात. तर प्रकाश आंबेडकर यांचे 35 वर्षापासूनचे एकमेव निकटवर्तीय कार्यकर्ते जफारखाँ पठाण यांची दावेदारी सुद्धा मानल्या जाऊ शकते.

### असे इच्छुक उमेदवार

महायुतीकडून- आ.देवेंद्र भूयार, माजी महिला बालकल्याण सभापती अर्चना मुरूमकर, माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीधर सोलव, अमोल भुयार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अमित कुबडे हे उमेदवारी मागत आहे. महाविकास आघाडीकडून-माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख, गिरीश कराळे, योगेश घारड, प्रफुल भोजने इत्यादी इच्छुक उमेदवार दावेदारी करित आहे.

# अमरावती शहरात कायदा व सुव्यवस्था बोजवारा उडाला!

## गुन्हेगारी, अवैध धंद्यात प्रचंड वाढ - खा.बळवंत वानखडे



### पोलीस आयुक्तांसोबत घेतली बैठक

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )**- खासदार बळवंत वानखडे यांनी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्यासोबत बैठक घेत शहरात वाढत्या हत्येच्या घटना, वाढती गुन्हेगारी आणि अवैध धंदे यात वाढ झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला असल्याचे सांगितले, ज्यामूळे शहरातील वाढती गुन्हेगारी तातडीने नियंत्रणात आणण्याचे आदेश पोलीस आयुक्तांना यावेळी त्यांनी दिले. यावेळी या बैठकीला माजी मंत्री डॉ.सुनील देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, बबलू शेखावत, काँग्रेस महिला आघाडीच्या शहराध्यक्षा जयश्री वानखडे उपस्थित होत्या.

या बैठकीमध्ये काँग्रेसजनांनी अमरावती शहरात गेल्या काही दिवसांपासून नवीन गुन्हेगारी प्रवृत्ती उदयास आली आहे, तसेच यावर पोलिसांचा गुन्हेगारांवर वचक राहिलेला नाही हे निदर्शनास आणून दिले. मागील 10 दिवसात 7 हून अधिक खून झाले आहेत. तसेच शहरात अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. एमडी ड्रग्स, गुटखा विक्री व इतर अंमली पदार्थांच्या विळख्यात तरुणाई गुंतलेली आहे. त्याचबरोबर या गुन्ह्यात अल्पवयीन मुलांचाही सहभाग आहे. ही चिंताजनक परिस्थिती आहे. अमरावती शहरात कायदा व सुव्यवस्थेचा अबाधित राखण्यासाठी यापेक्षाही अधिक ?क्टिव्ह पोलीसिंग राबविण्याची गरज असल्याबाबत खासदारांनी सांगितले.

### तरुणाची दुचाकी, मोबाईल व रोख लंपास

**अमरावती** - रस्त्यावर बेशुद्ध पडलेल्या तरुणाची दुचाकी, मोबाईल व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना 8 ऑक्टोबर रोजी दुपारी 12 वाजता घडली. उपचारानंतर तरुणाने 14 ऑक्टोबर रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# 19 ला तृतीयपंथीयाची जनजागृती पदयात्रा




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )**- 'वॉक फॉर फ्रिडम' या दिवसाचे औचित्य साधुन समर्पण ट्रस्टकडून 19 ऑक्टोंबर रोजी नेहरु मैदान येथे जनजागृती रॅलीचे आयोजन केले आहे. दुपारी 3 वाजता ही रॅली निघणार आहे, ज्यामध्ये 300 हून अधिक तृतीयपंथी सहभागी होणार आहे. एका पत्रकार परिषदेत महामंडलेश्वर जूना आखाडा उज्जैन पीठ व समर्पण ट्रस्टच्या अध्यक्षा मां पवित्रा नंदगिरी यांनी ही माहिती दिली.

**समर्पण ट्रस्टचे आयोजन**

समर्पण ट्रस्ट लैगिंक आरोग्य संस्था गेल्या 12 वर्षापासून अमरावती जिल्ह्यात समलैंगिक तसेत तृतीयपंथी समाजाकरिता तसेच त्यांच्या आरोग्या विषयी माहिती देण्याचे काम करते.

पवित्रा नंदगिरी यांनी सांगितले की, समाजात वावरतांना त्यांना समाजाकडून सापत्न पणाची वागणूक मिळते. आम्हाला मान नको सम्मान द्या! या मागणीकरिता ही जनजागृती पदयात्रा काढण्यात येणार आहे. शासनासोबत लढलो तेव्हा सन 2014 मध्ये तृतीय पंथीयांना मतदानाचा अधिकार मिळाला. सरकारच्या वतीने देण्यात येणार्याप सुविधा मिळविण्यासाठी आम्ही लढा देत आहो. मात्र समाजाकडून जशी सामान्यांना वागणूक दिल्या जाते, तशी वागणूक दिल्या जात नसल्याने आम्ही नोकरी करु शकत नाही. अन्यथा तृतीय पंथियांनासुध्दा लग्नात, रस्त्याने भीख मागायची वेळ आली नसती. अमरावती जिल्ह्यात 9 हजार तृतीयपंथी आहेत.

त्यांच्या आरोग्याकडे कुणीच लक्ष्य देत नाही. त्यामुळे समर्पण ट्रस्ट च्या माध्यमातून त्यांच्या आरोग्यासोबतच शासकीय योजनेचा लाभ मिळून देण्याचे कार्य केल्या जाते. त्याच संदर्भात नेहरु मैदान येथून रॅलीचे आयोजन केले आहे. या पदयात्रेमध्ये कुठल्याही प्रकारची नारेबाजी केल्या जाणार नाही. शांततेच्या मार्गाने आम्हाला मान नको सम्मान द्या असे पोस्टर बॅनर घेऊन पदयात्रा काढण्यात येईल. पत्रकार परिषदेमध्ये आचल चव्हाण, यश चौधरी उपस्थित होते.

# एक दिवसीय वन्यजीव फोटोग्राफी कार्यशाळा



**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,( दि.16 )** - येथील जगदंब विणकर शिक्षण संस्था द्वारा संचालित जगदंब महाविद्यालय येथे प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने एक दिवसीय वन्यजीव फोटोग्राफी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून जगदंब महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश कोहळे व प्रमुख वक्ते म्हणून कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्रा.श्रीकांत वरूहेकर लाभले होते. सोबतच विद्यार्थ्यांना वन्यजीव क्षेत्रातील फोटोग्राफी संदर्भात मार्गदर्शन करण्याकरिता मुख्य प्रशिक्षक म्हणून अल्केश ठाकरे यांनी मार्गदर्शन करत कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.श्रुती पांडे यांनी केले.

तर संचालन श्रावणी उभाड, पाहुण्यांचा परिचय सुमैया कौसर, तसलीम फातिमा व आभार प्रदर्शन शुमेला तगदीस हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रा.डॉ.अमोल रावणकर, प्रा.डॉ.तुलीका खडसे, प्रा.दौलत राऊत, प्रा.तृप्ती झोडपे, प्रा. अंकिता गौड, सचिन रावेकर व अनिल कुंडे इत्यादींनी अथक प्रयत्न केले.

# प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट येथे वाचन प्रेरणा दिन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )** - विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी व्दारा संचालित प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड मनेजमेंट,बडनेरा येथे डॉ. ए.पी.जे.अब्दूल कलाम यांच्या जयंती निमित्य 'वाचन प्रेरणा दिवस' या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयीन ग्रंथालय व एन. एस. एस. विभाग याच्या सहयोगाने दि. 15 ऑक्टोबर 2024 ला करण्यात आले.




या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ब्रिजलाल बियाणी कॉलेजचे प्रा.सूरज हेरे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.दिनेश हरकुट होते. कार्यक्रमाची सुरवात ही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला हार व फुले वाहून करण्यात आली. त्यानंतर प्रो.राम मेघे कॉलेजच्या ग्रंथपाल डॉ. सुप्रिया बेजलवार यांनी प्रमुख पाहुणे डॉ.सूरज हेरे सर यांचे स्वागत पुष्पगुछ देवून केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, उपाध्यक्ष उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.डॉ.हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारणी सदस्य नितीन हिवसे, प्रा.डॉ.पूनम चौधरी, पंकज देशमुख,प्रा.विनय गोहाड आणि प्रा.गजानन काळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश हरकुट यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाचे आयोजन करण्याता आले होते.

त्यानंतर प्रो.राम मेघे कॉलेजच्या ग्रंथपाल डॉ. सुप्रिया बेजलवार यांनी कार्यक्रमाचे स्वागतीय भाषणात त्यांनी मिसाईल मन म्हणून ज्याची ओळख आहे असे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनाविषयीचा थोडक्यात परिचय दिला. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी वाचन प्रेरणा दिवस याविषयी मार्गदर्शन केले. यात त्यांनी वाचन प्रेरणा दिवस याचे महत्त्व काय? तसेच 'वाचाल तर वाचाल' या युक्तीचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. वाचनाने आपल्या आयुष्यात व व्यक्तिमत्वात कसा बदल घडतो. याविषयीची माहिती डॉ. सूरज हेरे यांनी विद्यार्थ्यांना दिली. या कार्यक्रमाला विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन आय. टी. शाखेची विद्यार्थ्यीनी शर्वरी जारे व आभार प्रदर्शन प्रा.शुभम कदम यांनी केले.

# मृत अर्भकाला खोक्यात घेऊन आदीवासी दाम्पत्याची भटकंती

## रुग्णवाहिकेतच झाली प्रसूती, मातृत्वाची विटंबना

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.16 )** - चिखलदरा तालुक्यातील काटकुंभ येथील आदीवासी दाम्पत्यावर आपल्या मृत अर्भकाला पृष्ठाच्या खोक्यात घेवून भटकंती करावी लागल्याची धक्कादायक आणि अंगावर शहारे आणणारी घटना सोमवारी(दि.14) उघडकीस आली.

गुड्डू भोजराज पटीले,(वर्ष 40,रा.काजलडोह) हिला सोमवारी सकाळी या महिलेला प्रसूती कळा जाणवू लागल्याने तिला नजीकच्या काटकुंभ प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले होते. तेथून नेहमीप्रमाणे 102 रुग्णवाहिकेद्वारे अचलपूर येथील महिला व बाल रुग्णालयात रेफर करण्यात आले. परंतू रस्त्यातच या महिलेची प्रसूती झाली. रुग्णालयात पोहचल्यावर डॉक्टरांनी झालेल्या बाळाची तपासणी केली. परंतू यावेळी डॉक्टरांनी बाळाला मृत घोषीत केले. या घटनेनंतर ही ओली बाळंणतीन आपले पती भोईराज पटिले व बहिणीसह परतवाड्याच्या चिखलदरा स्टॉप स्थित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्राम गृह परिसरात सोमवारी दुपारी 1 वाजता पृष्ठाच्या खोक्यात मृत अर्भकाला घेऊन आपल्या गावी जाण्याकरिता वाहनाची वाट पाहत होते. याचवेळी मेळघाटचे आमदार राजकुमार पटेल यांचे स्विय सहाय्यक छोटू तेलगोटे यांचे लक्ष या कुटूंबावर गेले. त्यांनी त्यांची चौकशी केली. त्यानंतर या प्रकाराची माहिती तत्काळ आ. राजकुमार पटेल यांना दिली. त्यानंतर आमदारांनी सीएस आणि इतर ठिकाणी संपर्क साधून यंत्रणेला जागे केले. त्यानंतर काही वेळातच तेथे रुग्णवाहिका पोहचली आणि त्यांना परत अचलपूर येथील महिला व बाल रुग्णालयात नेण्यात आले.



चिखलदरा तालुक्याच्या काजलडोह येथील महिलेची रुग्णवाहिकेतच महिलेची प्रसूत झाली होती. बाळ मृत असल्याचे समजताच त्यांनी रुग्णालयात दाखल न होता परस्पर निघून गेले. त्या संदर्भात पोलिसांनाही माहिती देण्यात आली. रुग्णवाहिका बोलवून त्यांना त्यांच्या गावी पाठविण्यात येत आहे.

**डॉ.विजय सिरसामकर,**
**महिला व बाल रुग्णालय, अचलपूर.**

### पोलीसांना दिली माहिती

अचलपूर येथील महिला व बाल रुग्णालयात दाखल न होता मृत अर्भक घेऊन निघून गेलेल्या या आदिवासी जोडप्या संदर्भात डॉक्टरांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली होती. असे डॉक्टरांनी सांगितले. त्यांना काटकुंभ आरोग्य केंद्राची रुग्णवाहिका बोलावून परत पाठविल्या जाणार असल्याचेही सांगण्यात आले.

# प्रविण पोटे यांच्या निधी अंतर्गत 3.75 कोटींच्या विकास कामांचे लोकार्पण

## शेगाव, रहाटगाव प्रभागातील नागरिकांनी मानले आभार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )** - भाजपा अमरावती जिल्हा शहर अध्यक्ष आ.प्रविण पोटे यांच्या निधी अंतर्गत शेगाव- रहाटगाव प्रभागात 3.75 कोटी रुपयांचे विकास कामे सुरु आहेत, ज्यामध्ये 250 पेक्षा अधिक कामे पूर्णत्वास गेली आहे. याची पोच पावती म्हणून शेगाव-रहाटगाव परिसरातील नागरिकांनी माजी मंत्री प्रविण पोटे यांचा सत्कार व जाहीर आभार सोहळा आयोजित केला आहे. या जाहीर आभार सोहळ्याला श्रेयश पोटे प्रामुख्याने उपस्थित होते. माजी मंत्री प्रविण पोटे यांनी नेहमी शहरातील जनतेच्या समस्या, मागण्या ऐकून त्या पूर्णत्वास नेल्या आहे, नागरिकांना आवश्यक असणाऱ्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपल्या निधी अंतर्गत विविध विकास कामे केली आहे. यात प्रामुख्याने रस्ता काँक्रीटीकरण, रस्ते डांबरीकरण, नाली बांधकाम, उद्याने नुतनीकरण, पेव्हींग ब्लॉक, समाज मंदिर ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्यासाठी निवारा, नाला खोलीकरण यांचा समावेश आहे. प्रविण पोटे यांनी जातीने लक्ष घालून सर्व कामे जनतेच्या मनाप्रमाणे पूर्ण केली. शेगाव, रहाटगाव परिसरात भेडसावणाऱ्या समस्येचे तत्काळ निवारण करून विकास कामे केल्याबद्दल नागरिकांच्यावतीने प्रविण पोटे यांचे या सोहळ्याच्या निमित्ताने जाहीर आभार मानले. यावेळी चेतन पवार, प्रकाश पुंड, धीरज बारबुद्धे, धनराज चक्रे, अभिजित वानखडे, वंदना मडगे, डॉ.अनुभूती पाटील, खडसे काका, अंबादास तायडे, नरेंद्र भेंडे व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

